ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 8 | APRIL - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ‘छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे पहिले लोकशाही राज्य’



डॉ. लदाफ एस.के.
इतिहास विभाग , आझाद महाविद्यालय , औसा
ता. औसा जि. लातूर (महाराष्ट्र).

**सारांश :-**

साडेतीनशे वर्षापुर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतक-यांना बि-बियाने अवजारे बैलगाडी, बैलाची जोडी, मोफत पुरवठा करीत असत. तसेच बिगर व्याजी कर्ज दिले जात असत. तसेच दुष्काळ ग्रस्तांना मदत केली जात असत. शिवरायांच्या राज्यात भेदा भेद केल्या जात नव्हता. आणि शेतक-यांचे श्रमिकांचे हित जोपासले जात होते. छत्रपती शिवाजीमहाराजांचा इतिहास केवळ लढायांचा इतिहास नाही तर त्यांनी निर्माण केलीली आदर्श शासन व्यवस्थापनाचा पाया होता. त्यांनी सर्वत्कृष्ट कृषी धोरण आखले रचनात्मक प्रशासन, व्यवस्था निर्माण केली. पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन केले तसचे योग्य जलव्यवस्थापन केले महिलांच्या प्राथमिक गरजांपासुन ते सुरक्षीतेपर्यंत बारकाईने लक्ष दिले. शत्रुंच्या स्त्रीयांच्या मातेप्रमाने आदर करणारे शिवराय आणि त्यांचे स्त्री धोरण खरोखरच क्रांतीकारक होते. शिवरायांच्या विविध पैलुमुळे व अचुन सामाजिक धोरणामुळे हे जगातील सर्वोच्च परिवर्तनवादी चळवळीची प्रेरणास्थान बनले. त्यांनी अतिशय प्रतिकुल परिस्थितील तनर्माया केलेले स्वराज्य हे जगातील पहिले लोकशाही राज्य आहे. त्यांनी 17 व्या शतकामध्ये अनेक उत्तम व्यवस्थांची निर्मिती केली तसेच शिवाजी महाराजांनी राजसत्ता ही धर्मसत्तेपेक्षा श्रेष्ट असल्याचे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवुन दिले.

आज आपल्या देशाने स्वीकारलेली लोकशाही ही शिवरायांनी आपल्या सादेतीनशे वर्षापुर्वी आपल्या राज्यसत्तेतुन राबवीत असलेली दिसुन येते आज आपल्य लोकशाही शासन पध्दतीमध्ये दुष्काळ ग्रस्तांना मदत, शेतक-यांना मदत किंवा आर्थिक बोज म्हणुन शेतकसारा माफ किंवा अनुदान पध्दत ही आज 21 व्या शतकात दिली जाते. त्याच प्रमाने शिवरायांनी आपल्या प्रशासनात किंवा कार्यातुन दाखवुन दिले आहे. आजच्याकाळात शिवरायांची कृषीधोरण, व्यापारीधोरण, चलन व्यवस्थापन, जल व्यवस्थापन हे द्विप स्तंभाप्रमाने मार्गदर्शक ठरणारे आहे म्हणुन शिवरायांचे स्वराज्य हे पहिले लोकशाहिचे राज्य होते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

## प्रस्तावना :

बंधू प्रेम प्रत्यक्षात उतरविणारा योध्यांचे प्रेरणास्थान असलेला मानवतावादी व लोक कल्याणकारी तत्त्वांचा निर्माता राजा सामाजीक विषमतेला मुठमाती देणाना स्त्रीयांचे स्वरक्षण व गोर गरिब जनतेला शेतक-यांचा कष्टक-यांचा कैवारी छत्रपती शिवाजी महाराज होय. महाराजांनी रयतेचया सुखी समाधी करण्यासाठी त्यांना अठरापगड जातीच्या मावळ्यांनी एकत्र करुन त्यांच्या स्वाभीमानाचे बीज पेरुन ख-या अर्खाने स्वराज्य स्थापनेच्या लढाईत सहभागी करुन घेतले आणि डोंगर कपारीतील सामान्य जनेतेमध्ये राष्ट्रभक्तीची चेतना निर्माण करन स्वराज्य स्थापन केले स्वराज्याची स्थापना म्हणजे अखंड भारताच्या इतिहासातील सोनेरी पान आहे. म्हणुन छत्रपती शिवाजी महाराज हे भारत वर्षाचे प्रेरणास्त्रोत आहेत.(1)

छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात केलेली स्वराज्य स्थापना ही देशाच्या इतिहासातील एक महान घटना आहे. शिवाजी म्हटले की लढाया, लष्कर, प्रशासन आरमार आणि दुर्ग इत्यादी दृष्य डोळ्यां समोर येतात आणि ते स्वाभावीक आहेत. परंतू स्वराज्य स्थापने बरोबरच त्याच बरोबर स्वराज्य इतकेच महान कार्य महाराजांनी उद्योग व्यापार व

शेती श्रेत्रात केले आहे. महाराजंनी वतन व्यवस्थेवर कठोर प्रहार करुन गरिब रयतेला वतनदारांच्या जुलुमजबरदस्तीतून मुक्त केले. कृष्णाजी अनंत सभासदांच्या बखरीमध्ये शिवकालीन समाजात वतन संस्था किती बळकट होती.आणि वतनदार कसे शिरजोर होते यात दाखवले. कोनीही कोनापासू न मन मानेल किंवा फुकट कांही घेवु नये हे शिवाजी महाराजांच्या प्रशासनाचे धोरण होते. वतनदारांना वतनदार करुन त्यांच्या जोखंडातुन सामान्य रयतेची केलेली सुटका असले, स्त्रीया विषचे धोरण असेल, परराष्ट्र धोरण, युध्द कौशल्य, राजकिय मुत्सदेगिरी, किंवा शेतक-याविषयीचे धोरण, असेल सर्वेच पैलुचे वस्तुनिष्ठपने संशोध केले तर आजच्या लोकशाही शासन पध्दतीचे धोरण अखल्या प्रमाणे होते.(2)

छत्रपती शिवाजी महाराजांनी सामाजीक न्यायाची रोखठोक भुमिका घेवुन समाता समानता न्याय स्वातंत्रय बंधुता स्थापन केली. स्त्रीयांन संरक्षण दिले. स्वधर्माचा अभिमान बाळगतांना इतर धर्माचाही मान राखला राजा व त्याचे मंत्रीमंडळ, हे रयतेचे सेवक आहेत, हे सर्वप्रथम शिवाजी महाराजांनी मांडले. नुसते मांडलेच नाही तर त्यांची अमलबजावनी केली शिवाजीचे राज्य म्हणजे पहिले लोकशाही राज्य होय या राज्यात रयतेच्या गवताला (काडी) ला हात लावण्याचे अधिकार राज्य सेवकास नव्हते. यावरुन असे वाटते की, छत्रपती शिवाजी महाराजांना शेतक-यांबद्दल प्रचंड आदर व प्रेम होता. शेतक-यांच्या भाजीच्या देठालाही हात लावु नका अन्यथा आपली गय केली जाणार नाही. असा ईशारा आपल्या सैनिकांना दिला होता. शिवराय आपल्या एका पत्रात म्हणतात. 'पावाळा जवळ आला आहे चाराधान्य काटकसरीने वापरा आत्ताच चारा संपला तर पावसाळ्यात घोड्यांना चारा मिळणार नाही. मग घोडी तुम्हीच मारली असे होईल. शेतक-यांकडील दाने, गवत, जळण, भाजीपाला, आणाल तेव्हा रयतच म्हणेल कि मुघलांपेक्षा तुम्ही जास्त त्रासदायक आहात. रात्रीस दिवा घरात असेल उंदीर दिव्याची वात नेईल मग आग भडकेल त्या गोष्टी न होने. या कारणाने हमेशा फिरत जावुन काळजी घ्या. जनावरांची आणि शेतक-यांची काळजी घ्या. अन्यथा मराठ्यांची इज्जत वाचणार नाही.' यावरुन शिवरायांनी सैनिकांना काटकसर करुन शेतक-यांचे हीत जोपासण्यास सांगितले तसेच शिवरायांची व्यवस्थापन पध्दती अतीशय उत्तम प्रकारची होती. (3)

शिवाजी महाराजांनी राज्यात राबवलेली महत्त्वाची योजना म्हणजे त्यांची पाणी व्यवस्थापन होय पाणी ही आयुष्यातील आवश्यक बाब आहे. हे लक्षात घेऊन शिवाजी महाराजांनी राज्यामध्ये पाण्याचे व्यवस्थपन केले जसे धरणे, तलाव, विहीरी, यांच्या माध्यमातुन पाणी साठवुन ठेवले त्यासाठी विविध अधिका-यांच्या नेमनुका केल्या शिवाजी महाराजांच्या पाणी व्यवस्थापनामुळे दुष्काळावर मात करता आली.

**धरणे :-** शिवाजीमहाराजांची अनेक ठिकाणी धरणे व बंधारे बांधली कोकनात आणि देशावर अनेक पुल बांधले हे काम त्यांनी स्वतः करुन घेतले त्यांचे पाटबंधा-याकडे अतिशय बारकाईने लक्ष होते. त्यांच्या काळात पाटाचे पाणी शेतीला पुरविणे ही एक सर्वसाधारण पध्दत होती. त्यामुळेच जमिनींना पाणी मिळत असेत त्यांना पाट-स्थळ असे म्हणत शिवाय विहीर खोदुन मोटेने पिकांना पाणी देत असत याशिवाय पाटबंधा-यांचा तिसरा महत्त्वाचा प्रकार म्हणजे पाण्याची साठवण करणे तळी खोदने, किंवा कांही ठिकणी धरणे बांधने होय अशा वेळी बांधकामातून येणारा खर्च सरकारकडून मिळत असे याशिवाय एखादे जुने धरण दुरुस्त करावयाचे असेल तर त्याचा खर्च कांही सरकारकडून तर कांही वर्गणी काढून करीत असत. (4)

**तळे :-** शिवरायांनी अनेक तळे निर्माण केली. त्यासाठी त्यांनी प्रोत्साहन सुध्दा दिले तळ्याचे पाणी शेतीसाठी सुध्दा वापरल जात असे. त्यामुळे शेतीचा उत्तम व्यवस्था होत असे. अनेक गावांना मिळुन एका तळ्याचे पाणी पिण्यासाठी दिले जात असे. तळ्याच्या निर्मिती बरोबरच शिवाजी महाराजांनी अनेक तलाव व विहीरीची देखील व्यवस्था केली होती. गावाला पाणी पुरवठा करण्यासाठी एक त्या गावात तळे असे किंवा गावाच्या बाहेरुन पाटाने पाणी गावात आणण्याची व्यवस्था केली जात असे. ही सर्व पाणी पुरवठयाची योजना आहे सरकारकडून केली जात असे. गडावर किंवा किल्ल्यावर पाणी पुरवठा करण्यासाठी शिवाजी महाराजांनी पाणीसाठविण्यासाठी जे जलाशय निर्माण केले ते अत्यंत कमी खर्चात पण टिकाऊ व सुरक्षित आहेत. गडावरील महालांच्या बांधकामासाठी जो दगड खणुन काढला त्या मोठ्या खड्यांनेच राजांनी मोठे तलाव निर्माण केले तसेच या जलाशयाच्या सुरक्षित बांधकाम करुन घेतले. शत्रुला देखिल जलाशय सापडणार नाहीत अशी सुरक्षित जलाशयाचे राजांनी निर्माण केले या त्यांच्या जलव्यवस्थानामुळे स्वराज्यात सुव्यवस्था निर्माण झाली. (5)

**तलाव आणि विहीरी :-** शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात अनेक तलाव बांधले या काळात अनेक गावात मोठमोठे तलाव व हौद बांधलेले व खोदलेले दिसतात. तशा तलावात बाहेरुन पाणी आणुन भरत. अशाप्रकारचे पुण्यामध्ये अनेक बांधले गेले. तलावाप्रमानेच शिवाजी महाराजांनी गावोगावी अनेक विहीरीबांधल्या आणि पाणी अडवा पाणी जिरवा ही योजना त्याकाळात पाय-या असलेल्य विहीरी बांधुन पाणी पुरवठा केला गढी मध्ये सुध्दा विहीर खोदलेल्या असत.(6)

**संदर्भ ग्रंथ :-**

1. पुण्य नगरी, विद्यासागर, कांदे पाटील : रविवार 14 फेब्रुवारी 2017 पृष्ठ क्र. 4

2. कित्ता : पृष्ठ क्र. 4
3. इतिहास संशोधन पत्रिका : पर्यावरण विषयी स्थापत्य विशारद छत्रपती शिवाजी महाराज, विजय कुलकर्णी पृष्ठ क्र. 101
4. कोकाटे श्रीमंत : देनिक लोकमत शिवचरित्र्यातुन आज काय शिकावे18/02/2008 पृष्ठक्र. 4
5. कित्ता : पृष्ठ क्र. 4
6. घाटे निरंजन : दैनिक एकमत पर्यावरणावरील दहशदवाद वाढतोय दि. 07/12/2006 पृष्ठ क्र. 12
7. राजवडे वि.का. : मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड : 21.
8. देशपांडे प्र.न. : छ. शिवाजी महाराज महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीक मंडळ मुंबई -2017
9. सोमनाथ रोडे : मराठ्यांचा इतिहास
10. बिराजदार टी.के. : मराठ्यांचा इतिहास
11. मोरवंचीकर : मराठ्यांचा इतिहास
12. दिनकर खाबडे : मराठ्यांचा इतिहास
13. प्रभाकर देव : मराठ्यांचा इतिहास
14. सावंत, जाधव : मराठ्यांचा प्रशासकीय व सामाजीक व राजकीय इतिहास
15. कोल्हारकर शं. ग : मराठ्यांचा इतिहास
16. मदन मार्डीकर : मराठ्यांचा इतिहास
17. जयसिंगराव पवार : मराठ्यांचा इतिहास
18. कोंडेकर आर.एस. : मराठ्यांचा इतिहास